उपवनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा यांचे कार्यालय
"वनभवन", दोंडाईचा रोड शहादा ४२५ ४०९.
दुरध्वनी क्रमांक :- ०२५६५ / २२३४८५, फॅक्स क्रमांक :- ०२५६५ /२२३४८५ ई-मेल:- dycf_shahada @yahoo.co.in

पत्र
अत्यंत महत्वाचे

विषय:- वनजमीन नंदुरबार...
वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड ,मुंबई यांना राज्य मार्ग क्र.१ शहादा ते धडगाव (८२/२०० कि.मी. ते १५३/९००कि.मी.)च्या कडेने भुमिगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरीता ०.९७५ हे. राखीव वनजमीन वळती करणेबाबत.

जा.क्र. ब/२०/जमिन/ ९९३ /सन २०१८-१९
शहादा. ४२५ ४०९ दिनांक. १९/०६/२०१८.

प्रति,
मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड ,
मजला क्र.९, मार्केट चेंबर्स-४, २२२ नरीमन पॉईंट
मुंबई- ४०००२१

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचा आदेश क्र एफएलडी-१६अ१८/ प्र.क्र. १७२/फ-१० दिनांक २३.०५.२०१८
२. म. मुख्य वनसंरक्षक प्रा. धुळे यांचेकडील पत्र क्रं. कक्ष-०५/नोडल/प्र.क्र./३१ दिनांक २८.०५.२०१८

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, वरील विषयांकित प्रस्तावास राज्य शासनाने संदर्भ १ अन्वयें काही अटींच्या आधिन राहुन तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे. (सोबत संदर्भिय पत्रांची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे.) सदर आदेशातील नमुद केलेल्या अटींची पुर्तता तात्काळ करण्याबाबत कळविलेले आहे. तरी प्रकल्प यंत्रणेने सदर अटींची तात्काळ पुर्तता करुन पुर्तता अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

संदर्भिय पत्रातील अट क्रं. २ नुसार २ हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरणा करीता प्रस्तावात सद्याचे प्रचलित दरानुसार वसुल करण्यात यावी असे कळविण्यात आले आहे. म. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील पत्र कक्ष-१७/नोसेल/मुले/अंदाजपत्रक/१३१२ दिनांक १३.११.२०१३ अन्वये दिनांक ०१.०४.२०१३ पासून दरपत्रके व तयार गुणक अंमलात आलेले आहेत.वरीष्ठ कार्यालयाकडील सुचनेनुसार सदर तयार गुणक (Ready Recknor) नुसार वसुल करावयाची रक्कमेचा नमुना क्र.५ करीता दर प्रति हे. सन २०१८-१९ साठी रु. ९५९२४८/- एवढा देण्यात आलेला आहे. त्यानुसार सुधारणा करुन सदर प्रस्तावात एकुण २ हे.क्षेत्राकरीता रक्कम रु (१९१८४९६/-) एकोणीस लाख अठरा हजार चारशे श्यहण्णव मात्र {(०.९७५ हे. राऊंड अप करुन १ हे. करीता १ X२=२) @ ९५९२४८= १९१८४९६/- } रक्कमेचा भरणा करावा लागणार आहे. सदर रोपवनाकरीता प्रकल्प यंत्रणेचे मान्यतेचे प्रमाणपत्र जोडण्यात येत आहे. भविष्यात यात काही बदल झाल्यास /रक्कमेत सुधारणा झाल्यास त्यानुसार रक्कम अदा करणे बंधनकारक राहील याची देखिल नोंद घ्यावी.

F:\Land 18614\LND LETTER.doc

वरीलप्रमाणे रक्कम रु. १९९८४९६/- मात्रचा भरणा Ad-hoc CAMPA च्या कॉर्पोरेशन बँक, ब्लॉक नं.११,सीजीओ कॉम्प्लेक्स, फेज -१, लोधी रोड ,नवी दिल्ली- ११०००३ या शाखेतील खाते क्रं.एसबी०१०२५२१८ मध्ये RTGS ने करुन त्याची Acknowledgement व तपशील या कार्यालयास सादर करावी.

तरी संदर्भ १ च्या आदेशातील सर्व मुद्यांची पुर्तता तात्काळ करुन पुर्तता अहवाल आंग्ल (English) भाषेत चार प्रतील या कार्यालयास सादर करावा. सोबत संदर्भिय पत्रांची छायांकित प्रत जोडून अग्रेषित करण्यात येत आहे.

**सोबत - वरीलप्रमाणे.**

मान्य मसुदा

उपवनसंरक्षक,
नंदुरबार वनविभाग, शहादा

**प्रतिलीपी -**म. मुख्य वनसंरक्षक, प्रा. धुळे यांना माहितीसाठी सविनय सादर.



F:\Land 18614\LND LETTER.doc